

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज, पांचगणी

(कला, वाणिज्य व विज्ञान) शिवाजी विद्यापीठ सलग्नीत ता. महाबळेश्वर, जि.सातारा

# Smt.MEENALBEN MEHTA COLLEGE, PANCHGANI

(Arts, Commerce & Science) Shivaji University Affiliated Tal.Mahabaleshwar, Dist.Satara

Ph : (Off.) 02168-240677, (Prin.) 299304
www.smtmmcollege.org smt.meenalbenmehtac@yahoo.com

SMT. MEENALBEN MEHTA COLLEGE, PANCHGANI REACCREDITED WITH GRADE B NAAC 2.41

# माहितीपत्रक
# PROSPECTUS
## 2023-24



कला | वाणिज्य | विज्ञान
Arts | Commerce | Science



## संस्थेची प्रार्थना

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।

राम, कृष्ण, रहीम, ख्रिस्त, बुद्ध, झरतुष्ट्र ।
महावीर मानव संत मानव्यांचे दीपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे वंदूया चरण ।।

सत्य, शील, प्रामाणिकता,
त्याग पिळवणुकीस आळा ।
मानव्याचे अधिष्ठान
ईशतत्त्व दर्शन ।

यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार ।
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणात ।।

**शिक्षणमहर्षी प.पू.डॉ.बापूजी साळुंखे**

---

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वानि देव वयुनानि विद्वान ।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नमः उक्तिं विधेम ।।

**ईशावास्योपनिषद्**

## ❋ संस्था परिचय :

"जेथे ज्ञानाची पहाटच उगवली नाही तेथे मला जावयाचे आहे. तेथील रंजलेल्या गांजलेल्यांच्या चंद्रमौळी झोपडीत मला ज्ञानदीप लावावयाचे आहेत. हे ज्ञानदीप हेच माझे जीवन दीप आहेत. वादळवाऱ्यात टिकणारे हे ज्ञानदीप हीच समाजाची शक्ती आहे." अशी शैक्षणिक विचारांची पेरणी करून **शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ साली** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. "**ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार**" हे संस्थेचे ध्येयवाक्य शैक्षणिक क्षेत्राला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरीत आहे. सत्यशील, प्रामाणिकपणा, त्याग, पिळवणूकीस आळा व सेवा ही मूल्ये अंगिकारीत विद्यार्थ्यांना सुसंस्कारीत करण्याचे कार्य संस्था अविरतपणे करीत आहे. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या दऱ्याखोऱ्यातील, दुर्गम भागातील दीन,दलित, अनाथ, भटक्या व विमुक्त जाती-जमातीतील मुलांना ४०० हून अधिक संस्कृती केंद्रातून संस्था ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. संस्थेत शिक्षण, कायदा, कला, वाणिज्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी नर्सिंग, हॉटेल मॅनेजमेंट इत्यादी प्रकारचे बालवाडी, पदविका, पदवी, पदव्युनर स्तरावरचे शिक्षण दिले जात आहे.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा नंदादीप व शैक्षणिक वारसा संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे व सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे या समर्थपणे चालवित आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी पाचगणी, महाबळेश्वर, जावली तालुका परिसरातील डोंगर दऱ्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने लावलेले एक ज्ञान रोपटे, संस्कार केंद्र म्हणजे श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज होय.

## ❋ पाचगणी शहराचे वेगळेपण :

पाचगणी म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर उभे राहते महाराष्ट्रातील उंच व थंड हवेचे ठिकाण. एक रमणीय पर्यटन क्षेत्र. जगप्रसिद्ध शैक्षणिक केंद्र, हवहवसं वाटणारं आल्हाददायक हवामान, संततदार पाऊस, गुलाबी थंडी, मनमोहक निसर्ग सौंदर्य असे बरेच काही. पाचगणी शहर हे समुद्रसपाटीपासून ४ हजार ३७५ फूट उंचीवर थंड हवेचे ठिकाण म्हणून सर्वदूर परिचित आहे. पाचगणीतील हिरव्या मखमलीची शाल पांघरलेली जमीन, आकाशाला गवसणी घालणारे उंच कडे, नजरेला चक्कर येईल अशा खोल दऱ्या, मनात उत्साहाचे कारंजे निर्माण करणारा सभोवतालचा परिसर हा पर्यटकांना नेहमीच खुणावत असतो. पाचगणी शहर हे जगप्रसिद्ध शैक्षणिक केंद्र म्हणूनही नावारुपाला आलेले आहे. येथे विविध शैक्षणिक संस्थेची ५८ इंग्रजी व मराठी माध्यमांची हायस्कूल व ज्युनि. कॉलेज ही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर्जानुसार ज्ञानदान करीत आहेत. पाचगणीच्या शैक्षणिक वातावरणातच अनेक नेते-अभिनेते घडलेले आहेत. अनेक उद्योजक व मान्यवरांची मुले येथे शिक्षण घेत असतात. महाबळेश्वर तालुक्यात कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेत उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारे अनुदानित असणारे एकमेव महाविद्यालय म्हणजे श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज होय.

## ❋ महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये :

जागतिक पर्यटन केंद्र असणाऱ्या पाचगणीत जगभरातील पर्यटक, इतिहासप्रेमी भेट देत असतात. इथे राहून

निसर्गाचा आनंद लुटत असतात. पाचगणीत पर्यटकांना तसेच इयत्ता १२ वी पर्यंत च्या शिक्षणाला सर्वांनी महत्व दिले. त्यांना हव्या त्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या मात्र सह्याद्रीच्या कड्याकपारीत, डोंगरदऱ्यात वसलेल्या वाड्यावस्तीतील ग्रामीण भागातील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे आपल्या गावापासून दूर असणाऱ्या महाविद्यालयात शिक्षण घेणे अशक्य होते म्हणूनच विद्यार्थी विशेषत: मुली या इच्छा असूनही उच्च शिक्षणापासून वंचित रहात. त्यामुळे डोंगरी भागातील वाढती शैक्षणिक गरज लक्षात घेऊन संस्थेने १९८६ सालापासून शासनाकडे महाविद्यालय सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. शैक्षणिक विकासाची गरज लक्षात घेऊन महाबळेश्वर व जावली तालुक्यात महाविद्यालय सुरू करण्याविषयी कै. ह. भ. प. दत्तात्रय महाराज कळंबे, कै. आ. जी. जी. कदम, पांचगणीचे माजी नगराध्यक्ष नानासाहेब कासुर्डे, माजी आमदार भिलारे गुरुजी. पांचगणी व महाबळेश्वर तालुक्यातील नागरिक आणि संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सर्व आजीव सदस्य, तत्कालीन विभागप्रमुख प्राचार्य एन. जी. गायकवाड व प्राचार्य एस. के. कुलकर्णी या सर्वांनी केलेल्या अथक प्रयत्नांस यश आले व शिवाजी विद्यापीठाच्या तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाने डोंगरी भागात महाविद्यालय सुरू करण्यास हिरवा कंदील दाखविला.

महाराष्ट्र शासनाच्या परवानगीने **जून १९९०** पासून पांचगणी येथे हे महाविद्यालय सुरू झाले आणि सुरुवातीपासूनच आपल्या कार्याने या महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठात एक वेगळा ठसा उमटविला आहे. तसेच युजीसीकडून **2F व 12B** ची मान्य मान्यता मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. तसेच जून **२०१३ पासून महाराष्ट्र शासनाने १००% अनुदानावर परवानगी दिलेली विज्ञान विद्याशाखा सुरु असून या शाखेतील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षेत गुणवत्तापूर्ण यश संपादन केले आहे.** शैक्षणिक वर्ष **२०१८-१९ पासून विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता पदव्युत्तर अभ्यासक्रम दूरशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यावतीने एम. ए. व एम. कॉम सुरू केले आहे.**

**महाविद्यालयास 3rd cycle नॅक पूर्नमुल्यांकनामध्ये २०१९ रोजी २.४१ गुण प्राप्त झाले व 'B' ग्रेड मिळाली.**

## महाविद्यालयाचे स्थान -

पांचगणी बसस्थानकापासून १ कि. मी. अंतरावर टेबललँडच्या दक्षिणेस डॉ. बापूजी साळुंखे मार्गावर ३॥ एकर जागेत महाविद्यालयाची सर्व सोयीसुविधांनीयुक्त अशी प्रशस्त इमारत उभी आहे.

या इमारतीत स्वतंत्र ग्रंथालय, संगणक लॅब, प्रयोगशाळा, जिमखाना, स्वतंत्र अभ्यासिका, सर्वसोयीनीयुक्त व तंत्रज्ञान सुविधा असणारे वर्ग आहेत. इमारतीसमोर प्रशस्त क्रिडांगण व त्यामध्ये खो-खो, व्हॉलिबॉल व कबड्डीचे मैदान लक्षवेधी ठरत आहे. क्रीडांगणानजीकचा शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा पुतळा परिसर, बगिचा व बहुउद्देशीय सभागृह हे महाविदयालयाच्या वैभवात भर घालत आहेत.

## महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग -

महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग शिक्षणमहर्षी डॉ. बापूजींच्या आदर्श विचारांचा व ध्येयांचा वारसा विद्यार्थ्यांना घडवित असताना जपत असतात. ते आधुनिकतेचा अंगिकार करीत आणि बदलत्या शैक्षणिक

प्रवाहाचा वेध घेत विद्यार्थी केंद्रीत शिक्षण देण्याचा मनोभावे प्रयत्न करीत आहेत. महाविद्यालयातील बहुतांशी प्राध्यापकांनी SET, NET, Ph.D. पदवी संपादन केली आहे. अनेक जणांना पदव्युत्तर अध्यापनाची मान्यता आहे. आमचे प्राध्यापक M.Phil., Ph.D. चे मार्गदर्शक व पुरस्कारप्राप्त आहेत. प्राध्यापकांचे संशोधन पेपर, संशोधनपर प्रोजेक्ट हे नियमित सादर होत असतात. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन काळात प्राध्यापकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करीत बहुसंख्येने वेबिनार आयोजित केले. Online क्लास घेतले असा आपल्या विषयांत पारंगत असलेला तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग हा कॉलेजचा अभिमान आहे. त्यांचा अनुभव, व्यासंग, शिस्त, ज्ञानलालसा, अध्यापन कौशल्य या सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मोलाची मदत होते. अध्यापनाबरोबर प्राध्यापक हे वेगवेगळ्या ठिकाणी व्याख्याने देतात. ग्रंथलेखन, संशोधन, सामाजिक संस्था इ. क्षेत्रांत त्यांचे कार्य सुरुच असते. आमच्या महाविद्यालयाचे प्राध्यापक कार्यरत आहेत.

## 'गिरिस्थान' नियतकालिक -

विद्यार्थ्यांना समाजपरिवर्तनाच्या मुख्य प्रवाहात सामील करून त्यांना समाजबांधणीत सामावून घेण्यासाठी त्यांच्या लेखणीतून अवतरलेले साहित्य व महाविद्यालयात वर्षभर राबविलेल्या विविध उपक्रमांनी युक्त 'गिरिस्थान' हे महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस प्रसिद्ध केले जाते. नियतकालिकात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांच्यातील साहित्यिक जागा करण्याचा प्रयत्न केला जातो.

विद्यार्थ्यांच्यातील साहित्यिक सुप्त कलागुणांना मुक्त व्यासपीठ मिळावे, त्यांच्या हातून सृजन साहित्याची निर्मिती व्हावी या हेतूने प्रत्येक वर्षी 'गिरीस्थान' हे नियतकालिक प्रसिद्ध केले जाते. या व्यासपीठावरून नवोदित साहित्यिक घडतील अशी अपेक्षा आहे.

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे -

प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान यांपैकी कोणत्याही एका वर्गात प्रवेश घेण्यासाठी खालील नियमांचे पालन करणे व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) सर्व वर्गांत विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार प्रवेश दिले जातील.

२) माहितीपुस्तकात असलेल्या प्रमाणित प्रवेश अर्जावरच विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशासाठी आवश्यक ती संपूर्ण माहिती वाचून त्यानुसार अर्ज भरून प्रवेश फीसह कार्यालयात दिला पाहिजे.

३) सर्व मागास विद्यार्थ्यांसाठी सरकारी व शिवाजी विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे आरक्षण ठेवले जाईल.

४) प्रवेशाबाबत प्रवेश समितीचा निर्णय सर्व विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक राहील.

५) विना अनुदानित तुकडीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमाप्रमाणे जादा फी भरावी लागेल.

६) प्रवेश अर्जाबरोबर खालील कागद पत्रके सादर करणे आवश्यक आहे.

अ) उच्च माध्यमिक परीक्षा गुणपत्रिकेची मूळ प्रत व तिच्या दोन झेरॉक्स प्रती.

ब) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या दोन झेरॉक्स प्रती.

क) ओळखपत्रासाठी फॉर्म भरणे व फोटो देणे आवश्यक आहे.

ड) फी सवलतीचा विहित नमुन्यातील अर्ज मुदतीत भरणे आवश्यक आहे. (सदर अर्ज मुदतीत न दिल्यास संपूर्ण फी भरावी लागेल.)

इ) आवश्यकतेनुसार जात प्रमाणपत्राच्या दोन झेरॉक्स प्रती देणे आवश्यक आहे.

ई) प्रवेश अर्जासोबत आधार कार्ड झेरॉक्स प्रत, ई-मेल इ. पुरावा देणे आवश्यक आहे.

फ) Academic Bank Credit ची एक प्रत.

## * पात्रता प्रमाणपत्र

१) पात्रता प्रमाणपत्रासाठी (Eligibility Certificate) करावयाचा अर्ज महाविद्यालयात मिळेल.

२) शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील अन्य महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्थलांतर पत्र (Transfer Certificate) आणणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र राज्यातील अन्य विधिमान्य विद्यापीठात पूर्वी शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनीही स्थलांतराचा दाखला (Migration Certificate) आणणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र राज्यावितिरिक्त अन्य राज्यातील विद्यार्थ्यांने वरील पत्रकांशिवाय स्थलांतराचा दाखला देणे आवश्यक आहे.

## सिनियर कॉलेज फी विषयीची माहिती -

१) वर्षाची संपूर्ण फी भरल्याशिवाय विद्यापीठ परीक्षेचा फॉर्म स्वीकारला जाणार नाही.

२) अनामत रक्कमेची मागणी विद्यार्थ्यांने कॉलेज सोडल्यावर ६ महिन्याच्या आत मूळ पावतीनिशी न केल्यास ती रक्कम परत मिळणार नाही.

३) एकदा घेतलेला प्रवेश काही कारणाने रद्द करावयाचा असेल तर नियमाप्रमाणे पहिल्या टर्मची फी भरल्याशिवाय प्रवेश रद्द केला जाणार नाही.

४) सर्वच विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षा फी आणि शिकवणी फी (Tuition fee) स्वतंत्रपणे भरावी लागेल.

५) शिक्षण फी खेरीज इतर कोणत्याही प्रकारची फी परत केली जाणार नाही.

६) विद्यार्थ्यांने आपला प्रवेश लेखी अर्जाद्वारे विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत रद्द करून घेतल्यास त्याने भरलेली फक्त शिक्षण फी परत केली जाईल. मात्र परत करावयाच्या रक्कमेतून प्रशासकीय खर्च म्हणून रु. २० टक्के फी कपात केली जाईल. वेळेत न येणाऱ्या अर्जदारांना ही सवलत मिळू शकणार नाही.

७) विद्याथ्याने विद्यापीठ पात्रतेपूर्वी आपला प्रवेश लेखी अर्जाद्वारे रद्द केल्यास त्याने भरलेली शिक्षण फी (Tutition Fee) परत केली जाईल. मात्र रु. २० % प्रशासकीय खर्च म्हणून घेतले जातील.

८) विद्यापीठ पात्रता झाल्यानंतर प्रवेश रद्द करून घेणाऱ्या विद्यार्थ्यास कोणतीच फी परत केली जाणार नाही.

## शिस्त व नियमावली -

१) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांने सर्व तासांना व परीक्षांना नियमितपणे हजर राहणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालयाच्या शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे.

३) महाविद्यालयात प्रवेश करताना प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र गळ्यात घालणे बंधनकारक आहे.

४) एखाद्या विद्यार्थ्याने प्रथम दिलेले ओळखपत्र हरविल्यास त्याने ताबडतोब ग्रंथालयात त्यासंबंधी लेखी अर्ज द्यावा. अर्जामध्ये ओळखपत्र हरविल्याचे योग्य कारण नमुद करावे. हरविलेले ओळखपत्र न मिळाल्यास

विद्यार्थ्याकडून योग्य ती फी आकारून नवीन ओळखपत्र देण्यात येईल.

५) प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या मालमत्तेची योग्य ती काळजी घ्यावी. महाविद्यालयाचे आवार, भिंती खराब करणे, थुंकणे, फळे, दरवाजे, खिडक्यांची तावदाने फोडणे, बाके, झाडेझुडपे यांची मोडतोड करणे इ. महाविद्यालयाच्या शिस्तीत बाधा आणणाऱ्या गोष्टी करू नयेत. अन्यथा योग्य दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

६) प्रत्येक विद्यार्थ्याने दरवर्षी पुढील वर्गात नवीन प्रवेश घ्यावा.

७) महाविद्यालयाच्या शिस्तपालन समितीने ठरविलेले नियम सर्व विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

८) सदर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या निर्णयानुसार स्नेहसंमेलन होणार नाही. मात्र एक दिवस **वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ** आयोजित केला जाईल.

९) गुटखा व तत्सम पदार्थ महाविद्यालयाच्या परिसरात सेवन करणे किंवा जवळ बाळगणे कायदेशीर गुन्हा समजण्यात येईल.

**अँटीरॅगिंग-**

१) रॅगिंगबाबत शासन पत्रक क्र. ५२/९८३ दि. १६/०७/९९ नुसार जो कोणी कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये किंवा तिच्याबाहेर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या रॅगिंग करीत असेल, त्यात भाग घेत असेल, त्यास प्रेरणा देत असेल किंवा त्याचा प्रचार करीत असेल तर त्याला अपराध सिद्ध झाल्यानंतर दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा होईल आणि दहा हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची देखील शिक्षा होण्यास तो पात्र राहील.

२) **सर्वोच्च न्यायालयाच्या व यु. जी. सी. च्या निर्णयानुसार महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी विद्यार्थी व पालकांचे 'अँटीरॅगिंग' बाबतचे ॲफेडेव्हिट प्रवेश अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.**

**हजेरी आणि सत्रपूर्ती -**

१) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याची प्रत्येक सत्रात किमान ८०% उपस्थिती असलीच पाहिजे. जर एखाद्या विद्यार्थ्याची उपस्थिती ८०% पेक्षा कमी भरत असेल तर त्यास विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही.

२) सत्रसमाप्तीपूर्वी घेण्यात येणाऱ्या सर्व चाचण्या व सत्र परीक्षांना प्रत्येक विद्यार्थ्याने उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

३) सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी प्रत्येक सत्रामध्ये किमान एकदा तरी विभागप्रमुख अथवा प्राचार्य यांना भेटावे आणि आपल्या पाल्याची हजेरी आणि प्रगती याविषयी अद्ययावत माहिती घ्यावी.

**शैक्षणिक अभ्यास सहल -**

महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहलींचे आयोजन करण्यात येते. त्याचा फायदा जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा. खाजगी वाहनातून सहलीस परवानगी दिली जाणार नाही.

# Fee Chart Academic Year 2023-24 अनुदानित विभाग फी

| Sr. No | Particular Of College Fee | B.A./ B.Com.I Chh.R.S. Scheme | B.A./ B.Com.II Chh.R.S. Scheme | B.A./ B.Com. III EBC Scheme | B.Sc. I Chh.R.S. Scheme | B.Sc. II Chh.R.S.S cheme | B.Sc. III Chh.R.S.S cheme | B.A./ B.Com.I SCH Scheme | B.A./ B.Com.II SCH Scheme | B.A./ B.Com.III SCH Scheme | B.Sc.I SCH Scheme | B.Sc.II SCH Scheme | B.Sc.III SCH Scheme | Paying |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Admission Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | - | - | - | - | - | - | 10 |
| 2 | Tution Fee | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 800 |
| 3 | Library Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | - | - | - | - | - | - | 100 |
| 4 | Gymkhan Fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | - | - | - | - | - | - | 150 |
| 5 | College Exam Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 6 | Uni.Youth Festival | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 |
| 7 | S.A.Fund | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 8 | Uni.Pro-Rata Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 9 | A.P.D.Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 10 | Magazine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 11 | Vikas Nidhi | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 12 | College Dev.Fund/CDF | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 13 | Ashwamegh Nidhi | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 14 | Ex.Co-Curricular Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 15 | Self Finan U.F/NSS | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 16 | Lead College Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 17 | Enviormental Fee | - | 275 | - | - | 275 | - | - | 275 | | - | 275 | - | - |
| 18 | Eligibility Fee | 75 | - | - | 75 | - | - | 75 | - | | 75 | - | - | 75 |
| 19 | Univ.Contingency Funr.(A.N.) | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 20 | Stu. Insurance Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 21 | E. Seva | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 22 | Laboratory Fee | - | - | - | 125 | 125 | 125 | - | - | | 125 | 125 | 125 | - |
| 23 | Kalyan Nidhi/Stu.Welfare Nidhi | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 24 | Youth Hostel Nidhi | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 25 | Cultural Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 26 | Flag.Day | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 27 | Apatkalin Nidhi Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 28 | I. D. Card | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 29 | Computar / Internet | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 30 | Journal Fee | - | - | - | 700 | 600 | 400 | - | - | - | 700 | 600 | 400 | - |
| 31 | C.O.C. Fee | - | 365 | 365 | - | 365 | 365 | - | 365 | 365 | - | 365 | 365 | 365 |
| 32 | SUK Diamand Jubilee Year Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 33 | Admission Online Process | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 |
| 34 | Stu.Acci / Mdical Aid.Fund | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 35 | Article & Journals | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 36 | ERP/Mis | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 37 | Carrier Cutta Fee | 365 | 0 | 0 | 365 | 0 | 0 | 365 | 0 | 0 | 365 | 0 | 0 | 365 |
| 38 | Brakages | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | Total | 2320 | 2520 | 2245 | 3145 | 3245 | 2770 | 2060 | 2260 | 1985 | 2885 | 2985 | 2510 | 3485 |
| | | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | Grand Total- | 2320 | 2520 | 2245 | 3145 | 3245 | 2770 | 2060 | 2260 | 1985 | 2885 | 2985 | 2510 | 3485 |

टीप : शासन व विद्यापीठाने फी मध्ये काही बदल केल्यास संबंधित फी देणे विद्यार्थ्यास बंधनकारक आहे

# अभ्यासक्रम व विषय

## कला शाखा/Art Faculty

### बी. ए. भाग १

अ) आवश्यक विषय : AECC-1 इंग्रजी

ब) बी. ए. भाग १ मधील विद्यार्थ्यांनी खालीलपैकी एक आवश्यक विषय निवडायचा आहे.
मराठी (CGE-1) /हिंदी (CGE-3) (आवश्यक)

क) बी. ए. भाग १ मधील विद्यार्थ्यांनी खालीलपैकी प्रत्येक ग्रुपमधील एक ऐच्छिक विषय निवडायचा आहे.

ऐच्छिक विषय ग्रुप :-
१) मराठी (DSC-A1) / हिंदी (DSC-A2)
२) इंग्रजी (DSC-A3) /अर्थशास्त्र (DSC-B3)
३) इतिहास (DSC-B1) /समाजशास्त्र (DSC-B2)
४) राज्यशास्त्र (DSC-B4)/भूगोल (DSC-B10)

**बी. ए. भाग १ साठी शारीरिक शिक्षण ही १० गुणांची परीक्षा अनिवार्य आहे.**

टीप- जून २०१८ पासून शिवाजी विद्यापीठ आदेशानुसार **CBCS** पॅटर्न प्रमाणे नवीन अभ्यासक्रम पद्धतीनुसार विषय निवड करावी लागेल.

**अत्यंत महत्त्वाची सूचना :-** सर्व विद्या शाखामधील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की शिवाजी विद्यापीठाने पदवीसाठी **'लोकशाही निवडणूक व सुशासन'** या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे. हा विषय सक्तीचा असून विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन पध्दतीने शिकायचा आहे. ही परीक्षा २५ प्रश्नांची ५० गुणांची असून विद्यार्थ्यांना ४०% गुण (२० गुण) प्राप्त करावे लागतील. संबंधित विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणार नाही.

## बी. ए. भाग २

**अ) आवश्यक विषय –** १) इंग्रजी  २) पर्यावरण अभ्यास

३) खालील तीन इंटरडिसिप्लीनरी विषयांपैकी आपण निवडलेल्या एका ऐच्छिक विषयाशी जुळणारा कोणताही एक इंटरडिसिप्लीनरी विषय –

| ऐच्छिक | ऐच्छिक विषयाशी जुळणारा इंटरडिसिप्लीनरी विषय |
|---|---|
| १) मराठी | महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास |
| २) हिंदी | ---- |
| ३) इंग्रजी | ---- |
| ४) इतिहास | महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास / लोकप्रशासन |
| ५) राज्यशास्त्र | महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास / लोकप्रशासन |
| ६) समाजशास्त्र | महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास / लोकप्रशासन |
| ७) भूगोल | लोकप्रशासन / जिऑग्राफी ऑफ टुरिझम् |
| ८) अर्थशास्त्र | लोकप्रशासन |

**ब) ऐच्छिक विषय –** एकूण दोन (प्रत्येकी दोन पेपर)

बी. ए. भाग १ मध्ये निवडलेल्या ४ ऐच्छिक विषयांपैकी कोणतेही दोन ऐच्छिक विषय निवडावेत. खालील ग्रुप मधून २ विषय निवडावेत.

ग्रुप १) मराठी / हिंदी/ अर्थशास्त्र

२) भूगोल / राज्यशास्त्र

३) इंग्रजी / समाजशास्त्र / इतिहास

टीप – मराठी / हिंदी / इंग्रजी यांपैकी एकच विषय निवडता येईल.

## बी. ए. भाग ३

**अ) आवश्यक विषय –** १) इंग्रजी (एक पेपर)

**ब) ऐच्छिक विषय –** बी. ए. भाग २ मध्ये निवडलेल्या दोन ऐच्छिक विषयांपैकी कोणताही एक स्पेशल विषय घेता येईल. त्याचे पाच पेपर्स राहतील, या महाविद्यालयात पुढील स्पेशल विषय शिकविण्याची सोय आहे.

| | | |
|---|---|---|
| १) इंग्रजी | २) हिंदी | ३) मराठी |
| ४) समाजशास्त्र | ५) अर्थशास्त्र | ६) इतिहास |

# वाणिज्य शाखा / Commerce Faculty

## B.Com. Part 1

1) English For Business Communication (AECC-C1)
2) Management principles and application (CC-A3) .
3) Financial Accounting (CC-A5) 4) Micro Economics(CC-A1)
5) Principles of Marketing (GEC-A1) 6) Insurance (GEC-B3)

* बी.कॉम-१ साठी शारीरिक शिक्षण ही १० गुणांची परीक्षा अनिवार्य आहे.

## B.Com. Part 2

1) English for Business Communication
2) Business Statistics 3) Corporate accounting
4) Macro Economics 5) Fundamentals Entrepreur-ship
6) Money and Financial System
7) Environmental Studies

## B.Com. Part 3

**Compulsory Subject**

1) Co-op. Development
2) Business Regulatory Framework
3) Modern Management Practice
4) Business Environment

**Optional Subject :**

A) 1) Advance Accountancy Paper I & III
2) Advance Accountancy Paper II & IV (Auditing / Taxation)

OR B) 1) Industrial Management Paper I & III
2) Industrial Management Paper II & IV

**Certificate Courses :** 1) Tally Prime 2) Advance Tally 3) Tax Expert

सूचना– * जून २०१८ पासून शिवाजी विद्यापीठ आदेशानुसार **CBCS** पॅटर्न सुरू होत असल्याने त्यावेळच्या नवीन अभ्यासक्रम पद्धतीनुसार विषय निवड करावी लागेल.

अत्यंत महत्त्वाची सूचना :– सर्व विद्या शाखामधील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की शिवाजी विद्यापीठाने पदवी अभ्यासक्रम 'लोकशाही निवडणूक व सुशासन' या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे. हा विषय सक्तीचा असून विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन पध्दतीने शिकायचा आहे. ही परीक्षा २५ प्रश्नांची ५० गुणांची असून विद्यार्थ्यांना ४०% गुण (२० गुण) प्राप्त करावे लागतील. संबंधित विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय प्राप्त पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणार नाही.

# विज्ञान शाखा / Science Faculty B.Sc. Part -I

Compulsory Subject - English (AECC-A)

Choose anyone group of the following.

1) Physics (DSC-A1), Chemistry (DSC-A1), Botany (DSC-A13), Zoology (DSC-A15)
2) Physics (DSC-A1), Chemistry (DSC-A1), Mathematics (DSC-A5), Statistics (DSC-A7)

* बी. एस्सी. १ साठी शारीरिक शिक्षण ही १० गुणांची परीक्षा अनिवार्य आहे.

## B.Sc. Part -II

**Compulsory Subject -** Environmental Studies

Choose anyone group of the following.

1) Physics, Mathematics, Statistics (PMS) 2) Physics, Botany, Zoology (PBZ)
3) Chemistry, Botany, Zoology (CBZ)

## B.Sc. Part -III

**Compulsory Subject -** English

Choose anyone group of the following.

1) Physics 2) Chemistry 3) Botany 4) Zoology

सूचना : १) प्रत्येक विषयास गुणवत्तेनुसार प्रवेश देणेत येईल. २) प्रत्येक विषयास मर्यादित प्रवेश आहेत.

सूचना– * जून २०१८ पासून शिवाजी विद्यापीठ आदेशानुसार **CBCS** पॅटर्न सुरू होत असल्याने त्यावेळच्या नवीन अभ्यासक्रम पद्धतीनुसार विषय निवड करावी लागेल.

अत्यंत महत्त्वाची सूचना :– सर्व विद्या शाखामधील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की शिवाजी विद्यापीठाने पदवी अभ्यासक्रम 'लोकशाही निवडणूक व सुशासन' या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे. हा विषय सक्तीचा असून विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन पध्दतीने शिकायचा आहे. ही परीक्षा २५ प्रश्नांची ५० गुणांची असून विद्यार्थ्यांना ४०% गुण (२० गुण) प्राप्त करावे लागतील. संबंधित विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय प्राप्त पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणार नाही.

**परीक्षा पद्धती -**

महाविद्यालय शिवाजी विद्यापीठ व यू. जी. सी. मार्गदर्शन नियमानुसार परीक्षा घेतल्या जातात. प्रत्येक विद्यार्थ्यांनी स परीक्षा देणे आवश्यक आहे.

**अ. अंतर्गत मूल्यमापन परीक्षा :**

१. महाविद्यालयात अंतर्गत मूल्यमापन परीक्षा घेतली जाते. यामध्ये सरप्राईज टेस्ट, ओपन बुक टेस्ट तसेच तोंडी परी घेतल्या जातील. सदर परीक्षांना गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२. महाविद्यालयात प्रथम सत्र समाप्तीपूर्ती महाविद्यालयीन सत्र परीक्षेचे नियोजन केले जाते. प्रत्येक विद्यार्थ्यास ही परी अनिवार्य आहे.

**ब. विद्यापीठ परीक्षा :**

१. शिवाजी विद्यापीठाच्या वेळापत्रानुसार महाविद्यालयात सत्र-१ ते ६ च्या सर्व परीक्षा होतील.

२. विद्यापीठाच्या सूचनेनुसार महाविद्यालयात सेमिनार, होम असायमेंट व प्रोजेक्ट घेतले जातील.

## करिअर ओरिऐंन्टेड सर्टिफिकेट कोर्सेस -

नियमित पदवी बरोबरच विद्यार्थ्यांचे व्यावसायिक कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाने स्व:निमि (**Self Design**) विविध सर्टिफिकेट कोर्सेस सुरू केले आहेत. बी. ए., बी.कॉम., बी.एस्सी या वर्गात प्रवेश घेतले विद्यार्थी या कोर्ससाठी प्रवेश घेवू शकतात.

### विविध कोर्स

१) बॅक व्यवस्थापन (Certificate Course in Bank management)
२) व्यक्तिमत्व विकास (Certificate Course in Personality Development)
३) इतिहास आणि पर्यटन (Certificate Course in History and Tourism)
४) ग्रामीण पत्रकारिता (Certificate Course in Rural Journalism)
५) प्रयोजन मुलक हिंदी (Certificate Course)
६) Certificate Course in English Speaking Course
७) Certificate Course in Functional English
८) Certificate Course in Sericulture
९) Certificate Course in Water and soil Analysis
१०) Certificate Course in Study of Some electronic Components.
११) Certificate Course in Event Management

**प्रत्येक कोर्ससाठी विद्यार्थी प्रवेश मर्यादा ४० आहे.**

**टीप- प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास वरीलपैकी किमान एक कोर्ससाठी प्रवेश घे बंधनकारक आहे. कोर्स फी रूपये ५०० फक्त**

चालू शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मान्यताप्रा विविध COC कोर्स सुरु करीत आहोत. हे सर्व कोर्सेस व्यावसायाभिमुख व रोजगाराच्या संधी निर्माण करून देणारे अ आहेत. या कोर्सेसना महाविद्यालयाबरोबर इतर कोणीही प्रवेश घेऊ शकतात.

## "भाषा अकॅडमी पुणे" यांच्या अंतर्गत विदेशी भाषा शिकण्याचे तालुक्यातील एकमेव ठिकाण.

१) टॅली　　२) हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड टुरिझम
३) पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण　　४ ) व्यायामशाळा

**पदव्युत्तर दूरशिक्षण केंद्र :**

ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणाची संधी मिळावी या हेतूने महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठचे दूरशिक्षण केंद्र सुरु केले आहे. या केंद्रात M.A. व M.Com यासाठी प्रवेश दिला जातो. विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांना सत्रानुसार अध्यापन सत्रे आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांना घरी स्वयंअध्ययन साहित्य दिले जाते. विद्यापीठाच्या परीक्षा या महाविद्यालयात घेतल्या जातात. या केंद्रास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**ग्रंथालय -**

जून १९९० पासून महाविद्यालयाचे ग्रंथालय सुरू झालेले आहे. विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी उंचावणारे व त्यांना उत्कृष्ट मार्गदर्शक ठरतील असे उत्तमोत्तम संदर्भ ग्रंथ आणि क्रमिक पुस्तके यांचा विपुल संचय या ग्रंथालयात आहे. दरवर्षी या ग्रंथालयात नवनवीन ग्रंथांची भर पडत आहे. विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनात भर पडावी म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध नियतकालिके या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. नजीकच्या काळात महाविद्यालयाचे ग्रंथालय सर्वसोयींनी समृद्ध असणारे आदर्श ग्रंथालय होण्यासाठी स्वतंत्र अशी अत्याधुनिक सर्व सोयीनीयुक्त इमारत उभी करीत आहोत. त्यात स्वतंत्र अभ्यासिका व इतर सुविधा देत आहोत. हे ग्रंथालय सर्व पाचगणीकरांसाठी खुले असणार आहे. ग्रंथालयात अनेक उपक्रम राबविले जातात.

१) ग्रंथपेढी – महाविद्यालयातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना ग्रंथ पेढीच्यामार्फत अभ्यासाची सर्व पुस्तके उपलब्ध करून देण्याची सोय केलेली आहे. या योजनेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकाच्या मूळ किंमतीच्या १/४ किंमतीमध्ये आवश्यक ती सर्व पुस्तके अभ्यासासाठी दिली जातात.

२) अभ्यासिका – बऱ्याच विद्यार्थ्यांना घरी अभ्यासासाठी स्वतंत्र व्यवस्था नसते. अशा विद्यार्थ्यांसाठी आम्ही ग्रंथांनी सुसज्ज अशी दिवस रात्र चालणारी अभ्यासिका सुरू केली आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

३) विद्यार्थ्यांना प्रत्येकवर्षी उत्कृष्ट वाचक पुरस्कार देवून गौरविण्यात येते.

४) पुस्तक परीक्षण, वाचक कट्टा, ग्रंथप्रदर्शन असे उपक्रम राबविले जातात.

**ग्रंथालयाची वैशिष्ट्ये :-**

१) महाविद्यालयाचे ग्रंथालय डिजिटल झाले आहे.

२) महाविद्यालय शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राचे सभासद झालेले आहे. या ज्ञान स्तोत्रामधून E-Resources, E-Books, E-Juournals, E- Database इ. साधनांचे सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होतो.

३) महाविद्यालय N-LIST चे सभासद झाले आहे. त्यामधून ६००० + Journals व ६,००,००० + E-Book वाचायला मिळतात.

४) महाविद्यालयामध्ये सिनिअर लायब्ररी –९१९५ पुस्तके. UGC मधून २८५७ पुस्तके, देणगी दाखल ग्रंथ –११८० व बुक बॅंक योजनेमधून २२३ ग्रंथ असे एकूण १३,४५५ एवढी ग्रंथ संपदा आहे.

५) महाविद्यालयमध्ये ८०३१ क्रमिक पुस्तके आहेत.

६) महाविद्यालयामध्ये सर्व विषयांचे संदर्भग्रंथ ५४२४ एवढे आहेत.

७) सायन्स मधील क्रमिक पुस्तके ७४५ व सदंर्भग्रंथ २७४आहेत.

८) महाविद्यालयामध्ये एकूण वेगवेगळ्या १४ मासिके व जर्नल्स व १२ वर्तमान पत्र येतात.

९) आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षाकडे असणारा कल पाहून ग्रंथालयाने चाणक्य मंडळ परिवार, प्रतियोगिता दर्पण योजना व लोकराज्य असे एकूण ०९ मासिके सुरु केली आहेत.

१०) सायन्स विभागासाठी Current Science हे जर्नल दर पंधरा दिवसातून महाविद्यालयामध्ये नियमित येत असते.

**विद्यार्थी संसद-**

विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विद्यार्थी संसद मंडळाची नियुक्ती केली जाईल.

**अद्ययावत व्यायाम शाळा-**

महाविद्यालयात अद्ययावत अशी व्यायामशाळा सुरु केली आहे. याअंतर्गत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण व व्यायाम साहित्य सर्वांना उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांना शरीर आणि अभ्यासासाठी मन तंदुरुस्त राखण्यासाठी ही व्यायामशाळा

उपयुक्त ठरीत आहे.

**जिमखाना / क्रीडा विभाग**

**जिमखाना** – आमच्या महाविद्यालयात सर्व प्रकारच्या देशी व विदेशी विविध प्रकारच्या खेळांचे साहित्य उपल आहे. विविध प्रकारच्या खेळांसाठी लागणारे क्रीडांगण महाविद्यालयाच्या परिसरात आहे. खेळाडूंनी विविध स्पर्धां आपले कौशल्य दाखवून स्वत:बरोबरच महाविद्यालयाचे नावही उज्ज्वल करावे. या अपेक्षेने विविध क्रिडा स्पर्धांचे आयो केले जाते. विद्यार्थी खेळांडूची सर्व तयारी करून त्यांना विद्यापीठ व इतर स्पर्धासाठी वैयक्तिक व सांघिक स्तरावर स्पर्धेसा पाठविले जाते. महाविद्यालयाने अनेक विद्यापीठीय व राष्ट्रीय खेळाडू घडविले जातात. **बी.ए., बी.कॉम. व बी. एस भाग –१ वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाची १० गुणांची विद्यापीठीय परीक्षा सक्तीची आहे.** कॉलेजमध्ये घेतली जाते.

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) -

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांत राष्ट्रीय सेवाभाव, सामाजिक बांधिलकी इत्यादीची जाणीव व्हावी या हेतूने योजना सुरु करण्यात आली आहे. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना योजनेची दोन युनिट असून या योजने २०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. वर्षभरातील नियमित कार्यक्रम व विशेष श्रमसंस्कार शिबीरातून विद्यार्थ्यां वक्तृत्व, नेतृत्त्व, श्रमाची प्रतिष्ठा, संघटन कौशल्य नियमितपणा, वक्तशिरपणा असे विविध संस्कार केले जातात यामुळे विद्यार्थ्यांच्यात सामाजिक जाणिव निर्माण होवून त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व घडण्यास मदत होते. सदरच कोर्स पूर्ण केलेनंतर विद्यार्थ्यांना विद्यापीठाची १० मार्कस् मिळतात. यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढ ते विद्यापीठ मेरिटमध्ये येण्यास ही मार्क उपयुक्त ठरतात.

## विद्यार्थी कल्याण विभाग -

महाविद्यालयात विविध प्रकारची मंडळे आहेत. यात विद्यार्थी कल्याण मंडळ, गिरिभ्रमण विभाग, स्पर्ध परीक्षा मार्गदर्शन कक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांस्कृतिक विभाग, वक्तृत्व व वादविवाद समिती अ विविध विभाग कार्यरत आहेत. या विविध मंडळामार्फत विद्यार्थ्यांना विविध उपक्रमात सहभागी करून घेत जाते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी ही मंडळे उपयुक्त ठरतात.

## शिष्यवृत्ती व सवलती -

१) **सरकारी शिष्यवृत्ती** – राज्य सरकारची गुणवत्ता, प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणाऱ्या काह विषयांच्या, अपंग विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या तसेच शास्त्र संशोधन, बुद्धिमत्ता इ. शिष्यवृत्त्या उपलब्ध करून देण्या सर्व प्रयत्न महाविद्यालयामार्फत केले जातात.

तसेच प्राथमिक शिक्षकांची मुले (पी.टी.सी.), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक/ शिक्षकेतर सेवकांची मुले, आजी माजी सैनिकांची मुले (Jawan & Ex. Jawan),, स्वातंत्र्यसैनिकांची मुले (Freedom Fighte concession) इ. शिष्यवृत्त्या व सवलतींसाठी विहित नमुन्यात अर्ज केल्यास फी माफी मिळते.

२) **शिवाजी विद्यापीठ शिष्यवृत्ती** –

१) शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती रु. १०,०००

२) शिवाजी विद्यापीठाच्या इतर शिष्यवृत्त्या बी. ए. भाग १ मध्ये प्रवेश घेतेलेल्या विद्यार्थ्यासाठी सामाजिक शास्त्र शिष्यवृत्ती, बी. ए. भाग २ मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी इतिहास व इंग्रजी विषयातील स्पेशल स्कॉलरशिप तसेच विद्यापीठ मेरिट स्कॉलरशिप, गणित (मॅथ्स्) व भौतिकशास्त्र (फिजिक्स) विषयातील राज्य सरकारची शिष्यवृत्ती इ. शिष्यवृत्त्यांचे संदर्भातील नियम व अटींची माहिती सूचन फलकावर लावली जाते. पात्र विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा .

३) **बी. सी. शिष्यवृत्ती** – मागासवर्गीयांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास जास्तीत जास्त सोयी भारत सरकार शिष्यवृत्तीद्वारे उपलब्ध करून देते.

शिष्यवृत्तीसाठी खालील पात्रता आवश्यक आहे.

१) विद्यार्थ्याची जात शासनाने मान्य केलेल्या मागासवर्गीय अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमातींमध्ये समाविष्ट असायला हवी. पूर्वाश्रमीच्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी बौद्ध धर्म स्वीकारला तरी त्यांना शिष्यवृत्तीसाठी पात्र समजण्यात येते.

२) बी. सी. स्कॉलरशिप (भारत सरकार शिष्यवृत्ती) साठी जातनिहाय उत्पन्न मर्यादा पुढील कोष्टकाप्रमाणे- **विद्यार्थ्यांना त्यांची जात, पालकांचे वार्षिक उत्पन्न यानुसार मिळणाऱ्या स्कॉलरशीप व फी सवलतीचा** तक्ता

| अ.नं. | जातीचा वर्ग | वार्षिक उत्पन्नाची मर्यादा | मिळणारी सवलत | आवश्यक कागदपत्रे/ दाखले | करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (S.C.) | रु. २ लाखापर्यंत | GOI | १. विद्यार्थ्यांना उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्याची सत्यप्रत<br>२. तहसीलदारांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला/वडील नोकरीत असल्यास नोकरीच्या ठिकाणचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला<br>३. पास झालेल्या गुणपत्रिकेची सत्यप्रत | |
| २. | अनुसूचित जाती (S.C.) | रु. २ लाखाच्या पुढे | फी सवलत फ्री शीप | १. विद्यार्थ्यांना उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्याची सत्यप्रत<br>२. तहसीलदारांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला<br>३. पास झालेल्या गुणपत्रिकेची सत्यप्रत | www.maha. dbt.got.in या |
| ३. | अनुसूचित जमाती, भटक्या जाती व इतर मागासवर्ग विशेष मागासवर्ग (S.T./V.J.N.T./O.B.C./S B.C.) | रु. १ लाखापर्यंत | GOI | १. विद्यार्थ्यांना उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्याची सत्यप्रत<br>२. तहसीलदारांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला/वडील नोकरीत असल्यास नोकरीच्या ठिकाणचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला<br>३. पास झालेल्या गुणपत्रिकेची सत्यप्रत | संकेत स्थळावरून ऑन लाइन अर्ज अचूक भरून त्याची हार्ड कॉपी महाविद्यालयात सादर करावी. |
| ४. | अनुसूचित जमाती, भटक्या जाती व इतर मागासवर्ग विशेष मागासवर्ग (S.T./V.J. N.T./O.B.C. / S B.C.) | रु. १ लाखापेक्षा जास्त | फी सवलत फ्री शीप | १. विद्यार्थ्यांना उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या स्कॉलरशिप दाखल्याची सत्यप्रत<br>२. तहसीलदारांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला तहसीलदाराच्या सही व शिक्क्यासहीत<br>३. पास झालेल्या गुणपत्रिकेची सत्यप्रत | |

| अ.नं. | जातीचा वर्ग | वार्षिक उत्पन्नाची मर्यादा | मिळणारी सवलत | आवश्यक कागदपत्रे/ दाखले | करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|---|---|
| ५. | राजर्षी शाहू शिष्यवृत्ती योजना (आर्थिक-दृष्ट्या मागास) (E.S.B.C.) | रु.१ लाखापर्यंत शासकीय नियमानुसार | फी सवलत फ्री शीप | सवलत अर्जावर तहसीलदार यांची सही व शिक्का | www.maha. dbt.got.in या संकेत स्थळावरून ऑन लाइन अर्ज अचूक भरून त्याची हार्ड कॉपी महाविद्यालय सादर करावी. |
| ६. | प्राथमिक शिक्षक पाल्य सवलत (P.T.C.) | मर्यादा नाही | फी सवलत फ्री शीप | सवलत अर्जावर पालक ज्या शाळेत सेवेत असतील तेथील मुख्याध्यापकांची सही व शिक्का घेवून संबंधित माध्य. शिक्षणाधिकारी यांची प्रती-स्वाक्षरी घेऊन अर्ज महाविद्यालयात सादर करणे. | अर्ज प्रेसमधून घेऊन पाल ज्या शाळेत सेवेत असती तेथील मुख्याध्यापकां सही, शिक्का घेऊन त अर्जावर शिक्षणाधिका यांची प्रतीस्वाक्षरी घेउ अर्ज महाविद्यायत सा करावा. |
| ७. | माध्यमिक शिक्षक पाल्य सवलत (S.T.C.) | मर्यादा नाही | फी सवलत फ्री शीप | सवलत अर्जावर पालक ज्या शाळेत सेवेत असतील तेथील मुख्याध्यापकांची सही व शिक्का घेवून संबंधित माध्य. शिक्षणाधिकारी यांची प्रती-स्वाक्षरी घेऊन अर्ज महाविद्यालयात सादर करणे. | अर्ज प्रेसमधून घेऊन पाल ज्या शाळेत सेवेत असती तेथील मुख्याध्यापकां सही, शिक्का घेऊन त अर्जावर शिक्षणाधिका यांची प्रतीस्वाक्षरी घेउ अर्ज महाविद्यायत सा करावा. |
| ८. | आजी/माजी सैनिक पाल्य सवलत (Ex. Jawan) | मर्यादा नाही | फी सवलत फ्री शीप | सवलत अर्जावर सैनिक कल्याण अधिकाऱ्याची प्रतीस्वाक्षरी घेऊन अर्ज महाविद्यालयात सादर करणे. | प्रेसमधून सवलत अर्ज घेउ अर्जावर सरपंच/ नगरसेव यापैकी एकाचा सही शिक्का घेऊन अ महाविद्यालयात साद करावा. |

(या संदर्भातील नोटीसा नोटीस बोर्डवर लावल्या जातील. संबंधित विद्यार्थ्यांनी वेळेत कागदत्राची पूर्तता करणे ही पूर्णत: विद्यार्थ्यांची जबाबदारी आ

सूचना - १) पूर्ततेसाठी सविस्तर नोटीस लावली जाईल. २) वरील सवलतींपैकी फक्त एकाच सवलतीचा अर्ज साद करावा. ३) वरील सवलत अर्ज प्रवेश घेतलेपासून पंधरा दिवसाचे आत महाविद्यालयात जमा करावा.

३. नापास किंवा शाखा बदलून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने पुन्हा त्याच वर्गात नियमित प्रवेश घेतल्यास त्यास फ्रीशीपसाठी अर्ज करता येईल.

४. विद्यार्थ्याचे वडील खाजगी अगर सरकारी नोकरीत असल्यास त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला (पगार, महागाई भत्ता इ. सह) संबंधित अधिकाऱ्याच्या सहीनिशी जोडावा.

५. विद्यार्थ्याने अर्जात नमूद केलेली जात आणि त्याला संबंधित माध्यमिक शाळेकडून मिळालेल्य

दाखल्यात असलेली जात एकच असावी.

६. विद्यार्थी जर मान्यताप्राप्त वसतिगृहात रहात असेल तर त्याने त्या वसतिगृहात जेवणासाठी होणारा मासिक खर्च आणि प्रवेश तारिख यासंबंधी संपूर्ण व बिनचूक माहिती द्यावी. वसतिगृह प्रमुखांचा दाखला आवेदन पत्राला जोडावा.

७. जर विद्यार्थ्याचा सख्खा भाऊ अगर बहीण महाविद्यालयीन शिक्षण घेत असेल तर त्याने त्यासंबंधी खुलासेवार माहिती अर्जात नमूद करावी.

८. आवेदनपत्राबरोबर पास झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका जोडावी.

९. जातीसंबंधी प्रमाणपत्र संसद सदस्य/राज्य संघराज्य क्षेत्र शासनाने विशेषरित्या प्राधिकृत केलेला अधिकारी यापैकी एकाची सही त्यावर असली पाहिजे.

१०. बी. सी. विद्यार्थ्यांना सरकारमान्य कोणत्याही प्रकारची फी भरावी लागत नाही.

११. बी. सी. शिष्यवृत्तीची रक्कम नियमितपणे दिली जाते.

१२. जो विद्यार्थी पूर्णवेळ नोकरी करत असेल तो बी. सी. शिष्यवृत्तीस पात्र ठरणार नाही.

१३. एकाच कुटुंबातील दोन पेक्षा अधिक मुलांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. तथापि तिसरी मुलगी असल्यास शिष्यवृत्ती मिळेल.

१४. शिष्यवृत्तीची रक्कम नियमित उपस्थित, अभ्यासातील समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक यावर अवलंबून असते.

१५. गतवर्षी ज्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे. अशा सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी प्रवेशाच्या वेळी स्वतंत्र अर्ज कार्यालयात सादर करावेत.

१६. **सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना बँक ऑफ महाराष्ट्र, पाचगणी शाखेत बचत खाते उघडणे अनिवार्य आहे.**

**राजर्षी शाहू शिष्यवृत्ती योजना (आर्थिकदृष्ट्या मागास मुलांसाठी फी माफीची योजना)** (E.S.B.C.)

१. ज्या विद्यार्थ्यांच्या आई वडिलांचे अगर वडील हयात नसल्यास पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १,००,००० पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येतो.

२. या सवलतींसाठी ठराविक नमुन्यात अर्जाच्या दोन प्रती महाविद्यालयात प्रवेश घेताना दिल्या पाहिजेत. अर्ज वेळेत देण्याची जंबाबदारी विद्यार्थ्यावर राहील.

३. ज्या वर्षी फी सवलतीसाठी अर्ज भरावयाचा आहे त्यावर्षी संपलेल्या आर्थिक वर्षातील (म्हणजे १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१) या वर्षाचे एकूण उत्पन्न हिशोबात धरावयाचे असते.

४. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी वडिलांच्या उत्पन्नाचा दाखला **तहसीलदारांचा** जोडावा.

५. शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी तहसीलदारांना अधिवास प्रमाणपत्र (डोमासाईल सर्टिफिकेट) देणे

आवश्यक आहे.

६. शहरी भागातील विद्यार्थ्यांनी वडिलांच्या उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांचा जोडावा.

* **नोकरी करत असलेल्या पालकांनी आपल्या नोकरीच्या ठिकाणचा उत्पन्नाचा सविस्तर (महिना पगार/एचआरए/ डीए/ इतर असे सर्व मिळून) याप्रमाणे दाखला जोडावा.**

७. ज्या विद्यार्थ्यांचे आई/वडील पालक यांचे नेहमी राहण्याचे ठिकाण महाराष्ट्र राज्याच्या सीमेत आहे त्यांनाच फक्त सरकारमान्य संस्थात ही सवलत मिळू शकते.

८. आई वडील हयात असल्यास दोघे किंवा त्यांच्यापैकी जे असतील ते मुलांच्या पालनपोषणासाठी जबाबदार आहेत असे गृहीत धरले जाईल. याशिवाय दुसरे नातलग म्हणजे चुलते, भाऊ, मामा इ. जबाबदार धरले जाणार नाही.

९. फी माफीची सवलत मिळणे नियमित उपस्थिती, अभ्यासातील समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक यावर अवलंबून असेल.

१०. फी माफी घेणारा विद्यार्थी या नियमांचे पालन करीत नाही असे आढळून आल्यास ही सवलत काढून घेतली जाईल.

## अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती -

**शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना अनुसरावयाची पद्धत–**

१. जर विद्यार्थी प्रथमच प्रवेश घेत असेल तर त्याने शिष्यवृत्ती आवेदनपत्र भरावे.

२. महाविद्यालयीन शिक्षणात खंड पडला असल्यास संबंधित कालावधीत शिष्यवृत्ती न मिळाल्याचे प्रतिज्ञापत्र जोडावे.

३. नवीन शिष्यवृत्ती आवेदन भरणाऱ्या विद्यार्थ्याने आपला स्वतःचा फोटो स्वतःच्या सहीनिशी आवेदन पत्रास जोडलेल्या सूचीपत्रकावर लावावा.

४. आई वडील हयात नसल्यास नातेवाईकांची / पालकांची अर्जावर पालक म्हणून सही घ्यावी. शिष्यवृत्ती अर्जातील माहिती बिनचूक भरावी.

**टीप : सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी बदलेले नियम विचारात घेतले जातील.**

## माहिती तंत्रज्ञान केंद्र -

महाविद्यालयात अत्याधुनिक असे संगणक कक्ष स्वतंत्रपणे आहे. येथे विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण दिले जाते तसेच विविध कोर्सचे आयोजन केले जाते. या संगणक कक्षात तसेच महाविद्यालय परिसरात मोफत इंटरनेट वायफायची सुविधा उपलब्ध आहे. कॉलेजच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी झेरॉक्सची व्यवस्थाही करण्यात आली आहे. वेबिनार, ऑनलाईन कार्यशाळा, व्याख्याने इत्यादी उपक्रमांचे आयोजनही या कक्षामार्फत करण्यात येते.

# महाविद्यालयातील पारितोषिके

१) प्राचार्य डॉ. सतीश देसाई उत्कृष्ट वाचक पुरस्कार ५०१ रुपयांचे पारितोषिक

२) डॉ. बी. एन. कोकरे बी.एस्सी. भाग ३ कै. निवृत्ती नेमाजी कोकरे यांच्या स्मरणार्थ रसायनशास्त्र विषयात प्रथम येणारा विद्यार्थी ५०१ रुपयांचे पारितोषिक

३) डॉ. तुकाराम राबाडे कै. पारुबाई गोविंद राबाडे यांच्या स्मरणार्थ बी.ए. भाग–२ अर्थशास्त्र विषयात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी ५०१ रुपयांचे पारितोषिक

४) प्रा. श्रीमती जयश्री खांबेटे कै. इंदिराबाई पुरुषोत्तम फडके यांच्या स्मरणार्थ बी. ए. भाग–३ अर्थशास्त्र विषयात प्रथम २५१ रुपयांचे पारितोषिक

५) प्रा. एन. व्ही. शिंदे कै. प्रदीप शिंदे स्मृती फिरता चषक

१) राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट स्वयंसेवक –२५१ रुपयांचे परितोषिक

२) राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट स्वयंसेविका –२५१ रुपयांचे परितोषिक

६) अजिनाथ भगवान दडस कै. भगवान तात्याबा दडस यांच्या स्मरणार्थ महाविद्यालयातील आदर्श गुणवंत विद्यार्थी ११११ रुपयांचे परितोषिक

# महाविद्यालयातील गिरिस्थान लेखन महोत्सव सप्ताह निमित्त दिली जाणारी बक्षिसे

प्राचार्य डॉ. सतीश देसाई रिल्स / व्हिडिओ स्पर्धा ५०१ रुपयांचे पारितोषिक

प्रा. सतीश कुदळे उत्कृष्ट पत्रलेखन ३०१ रुपयांचे पारितोषिक

डॉ. बी. एन. कोकरे उत्कृष्ट जाहिरातलेखन ५०१ रुपयांचे पारितोषिक

प्रा. नरेंद्र फडतरे कथालेखन ३०१ रुपयांचे पारितोषिक

**प्रत्येक स्पर्धेत विजाता प्रथम स्पर्धाकास २५१,**
**...तीय क्रमांक २०१ रु. व १५१ रु. व प्रमाणपत्र अशी बक्षिसे दिली जातात.**

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Sr. No 002731

# CERTIFICATE

This is to certify that University approval is given to *Smt. Meenalben Maheta College (Arts, Commerce & Science), Panchgani, Tal.Mahabaleshwar, Dist.Satara* to conduct the following courses for the academic year 2021-22.

**Faculty of Humanities, Commerce & Management and Science & Technology**

**B.A. I** **Grant-in-aid-Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Recent Approval - गुकेएफ/१०९२/९०-९१/५०१९/विशि-२ दि.१९ एप्रिल, १९९२.
University Recent Approval - संलग्नता/टी.२/पीबीवाय/८२८४, दि.१८ ऑक्टोबर, २००५.
Compulsory - इंग्रजी, मराठी, हिंदी
Optional - मराठी, इंग्रजी, हिंदी, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, राज्यशास्त्र.

**B.A. I** **Grant-in-aid-Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Recent Approval - गुकेएफ/१०९२/९०-९१/५०१९/विशि-२ दि.१९ एप्रिल, १९९२.
University Recent Approval - संलग्नता/टी.२/पीबीवाय/८२८४, दि.१८ ऑक्टोबर, २००५.
Compulsory - इंग्रजी, आयडीएल-एचएसआरएम, लोकप्रशासन, जिओग्राफी ऑफ टुरिझम.
Optional - मराठी, इंग्रजी, हिंदी, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल.

**B.A. III** **Grant-in-aid-Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Recent Approval - गुकेएफ/१०९२/९०-९१/५०१९/विशि-२ दि.१९ एप्रिल, १९९२.
University Recent Approval - संलग्नता/टी.२/पीबीवाय/८२८४, दि.१८ ऑक्टोबर, २००५.
Compulsory - इंग्रजी.
Optional - मराठी, इंग्रजी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र.

**B.Com. I** **Grant-in-aid-Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Recent Approval - गुकेएफ/१०९२/९०-९१/५०१९/विशि-२ दि.१९ एप्रिल, १९९२
University Recent Approval - संलग्नता/टी.२/पीबीवाय/८२८४, दि.१८ ऑक्टोबर, २००५.
Compulsory - English Paper-1, Principles of Business Management, Principles of Marketing, Business Economics, Financial Accounting, Insurance.

**B.Com. II** **Grant-in-aid-Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Recent Approval - गुकेएफ/१०९२/९०-९१/५०१९/विशि-२ दि.१९ एप्रिल, १९९२.
University Recent Approval - संलग्नता/टी.२/पीबीवाय/८२८४, दि.१८ ऑक्टोबर, २००५.
Compulsory - English Paper 2, Accountancy, Business Planning & Policy, Banking & Finance, Business Statistics & Computer Application, Environmental Science, Business Economics.

**B.Com. III** **Grant-in-aid-Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Recent Approval - गुकेएफ/१०९२/९०-९१/५०१९/विशि-२ दि.१९ एप्रिल, १९९२.
University Recent Approval - संलग्नता/टी.२/पीबीवाय/८२८४, दि.१८ ऑक्टोबर, २००५.
Compulsory - Co-operative Development, Business Law, Management Thought, World Economics Eaviroment, Advance Accountancy Paper-I & II, Industrial Management I & II

Registrar,
Shivaji University.

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Sr. No. № 002732

-2-

**B.Sc. I** — **Grant-in-aid-Division - 1**

Govt. Recent Approval - एनजीसी-२०१२/ता एकमेव अनुदान/मवि-२/१९७१४, दि.१५/१/२०१३.

University Recent Approval - संलग्नता/टी-२/वि.प.वि.क्र.२८, दि.२३.०१.२०२०/०२८८ दि.०५.०३.२०२०.

Compulsory - इंग्रजी.

Optional - फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी, झूलॉजी, गणित, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र.

**B.Sc. II** — **Grant-in-aid-Division - 1**

Govt. Recent Approval - एनजीसी-२०१२/ता एकमेव अनुदान/मवि-२/१९७१४, दि.१५/१/२०१३.

University Recent Approval - संलग्नता/टी-२/वि.प.वि.क्र.२८, दि.२३.०१.२०२०/०२८८ दि.०५.०३.२०२०.

Optional - फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी, झूलॉजी, गणित, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र.

**B.Sc. III** — **Grant-in-aid-Division - 1**

Govt. Recent Approval - एनजीसी-२०१२/ता एकमेव अनुदान/मवि-२/१९७१४, दि.१५/१/२०१३.

University Recent Approval - संलग्नता/टी-२/वि.प.वि.क्र.२८, दि.२३.०१.२०२०/०२८८ दि.०५.०३.२०२०.

Optional - इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, संख्याशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र

**B.A. II**

University Circular - SU/BOS/Env.-Syl/Dhawan/11594/11125 Dt.16 March, 2005.

Compulsory - पर्यावरणअभ्यास.

**B.Com. II**

University Circular - SU/BOS/Env.-Syl/Dhawan/11594/11125 Dt.16 March, 2005.

Compulsory - पर्यावरणअभ्यास

**B.Sc. II**

University Circular - SU/BOS/Env.-Syl/Dhawan/11594/11125 Dt.16 March, 2005.

Compulsory - पर्यावरणअभ्यास.

**Courses running under Distance Education Centre, Shivaji University, Kolhapur –**
M. A., M. Com.

-------

Registrar,
Shivaji University,
Kolhapur.

## INSTRUCTIONS TO THE STUDENTS

1. Every Student Should see the complete syllabus prescribed for the concerned course take note of all rules and regulations.
2. Attendance of minimum 80% is essential (Please refer ordiances 30-37)
3. Students shall follow all the rules & regulations of the University and College.
4. The results of the University Examinations are available a 12525 for BSNL Landli Mobile Holders. The students can obtain printed copy of their statement of Marks University Website, which can be used for the purposes of verification of marks and to o the xerox copy of accessed answer book.
5. Students can avail the facility of revaluation after getting a xerox copy of the sessed answer book or verification of the marks.
6. The students having confidence to have change in result due to verification or revalu can take provisional admission subject to confirmation of change in result due to verific or revaluation.
7. The rules and regulations are available at the university website wwwunishivaji.a Important,frequently reffered rules are sent to the colleges in the printed booklet prepare the four sections of the university.
8. Students should complete all requirements of the course of time.
9. Students should use only blue ink for all examination works except where other pennitted to use the other ink.
10. The present intake for the certified courses like B.A, B.com & B.Sc. is 120 student division.
11. For grant-in-aid courses,the tuition fee for BA Rs.800/-, B.Com. 800/-, B.Sc. 800/- shou applicable as fixed by Shulka Nirdharan Samiti or University.
12. Examination calendar for the University Examination is to be declared in the first week c for complete year 2021-22 and student should verify the same & If there is any ch required student should communicate it within 15 days.
13. Seperate certificate will be issued by the university for additional course, if that course be started from the academic year 2023 - 24.
14. University is not responsible for any loss or otherwise if a student take admission to course other than those approved by university.
15. Every student must posses the necessary student identity card issued by the respe college.
16. Every student should be a member of Student Insurance Scheme.
17. Money/Fee is to be sent to university in DD form payable to Finance & Acc Officer.
18. Take benefits of Carrer Oriented Courses and Lead College Scheme activities
19. The students, parents,citizens shall visit the University website wwwunishivaji. for detailed information.

**Dr.Satish De**
I/C PRINCIPA

# प्रवेश अर्जासोबत द्यावयाचे हमीपत्र

विद्यार्थ्याचे नाव श्री./ कु. ______________________

संपूर्ण पत्ता : ______________________

______________________

फोन नंबर ______________________

दिनांक : / /२०

प्रति,

मा. प्राचार्य,

श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज,पाचगणी (आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स)

ता. महाबळेश्वर, जि. सातारा.

महोदय,

मी आपल्या महाविद्यालयात बी.ए./ बी. कॉम./ बी. एस्सी. भाग १/२/३ मध्ये प्रवेश घेतला असून माझा पावती नं. हा आहे. मी खालील सवलतीस पात्र असून प्रवेश घेतलेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत कार्यालयात सर्व पूर्तता करून देईन. वेळेत पूर्तता न झाल्यास महाविद्यालयातील सर्व फी भरणेस मी पात्र आहे, याची मला जाणीव आहे.

विद्यार्थ्याने खालील रकान्यात योग्य त्या ठिकाणी (✓) खूण करावी.

| | |
|---|---|
| 1. E.B.C./E.S.B.C. | 5. Ex-Serviceman |
| 2. S.T.C. | 6. B.C., SC., ST., VJNT., SBC, OBC |
| 3. P. T. C. | 7. B.C. Freeship SC., ST., VJNT., SBC, OBC |
| 4. F. F. | 8. Paying |
| | 9. Other |

विद्यार्थ्याची सही

महाविद्यालयाच्या माहिती पुस्तिकेमध्ये छापवायचा मराठी नमूना

